( ५ ) **चंद्रप्रभा**— चंद्राचे वाङ्मयांतील उल्लेख, चंद्रामुळें पंचांग कसें चंद्रावर वसाहत करणें कितपत शक्य आहे, चंद्राचीं ग्रहणें, भरती, ओहोटी संबंधानें खुलासा व चटकदार वर्णन. डे. व्हर्नाे. ट्रान्स्लेशन सोसायटीनें पारि देऊन गौरविलेलें पुस्तक. पृष्ठसंख्या १३०, किंमत रु. २·५०.

*　*　*　*

( ६ ) **विश्वाची रचना व उत्क्रांति**—( ले. कै. त्र्यं. गो. द सबंध विश्वाची घडण क्रमशः कशी होत गेली, अभिक्रा; दीर्घिका; काय अ या विश्वाची उत्क्रांति कशी होत आहे, यासंबंधीं सोपपत्तिक माहिती. पृष्ठें किंमत रु. ०·७५.

*　*　*　*

( ७ ) **संज्ञावली**—ज्योतिष्यक शास्त्रातील पारिभाषिक शब्दांचे विवरण. पृष्ठें २३. किंमत रु. ०·२५.

*　*　*　*

( ८ ) **छोट्या पुस्तिका व प्रकाशनें निबंध**— ( १ ) **कालमा त्याचीं साधनें** ( ले. कै. त्र्यं. गो. ढवळे ) काल म्हणजे काय, त्याचें मापन इ. खुलासा. ( २ ) **पाश्चात्त्य ज्योतिष्यकाचा वैचारिक इतिहा** ( ले. कै. त्र्यं. गो. ढवळे ) ख्रिस्तपूर्व दीड हजार वर्षांपासूनच्या पाश्चात्त्य शास्त्र कल्पना व बदल यांची माहिती. ( ३ ) **सूर्याचें अंतरंग**— ( लेखक : प्रा. ढवळे ) सूर्याच्या अंतरंगासंबंधानें माहिती. ( ४ ) **सूर्यदेवता**— ( लेखव मो. ल. चंद्रात्रेय ) सूर्यासंबंधानें वाङ्मयांतले कांहीं उल्लेख. ( ५ ) **आर्यांच्य वसतिस्थानांसंबंधीं झालेल्या व्याख्यानमालेंतील मुद्यांचें टांचण.** सर्व छोट्या पुस्तकांची किंमत प्रत्येकीं रु. ०.१२

*　*　*　*

**टीप**—१. प्रकाशनें व्ही. पी. नें पाठविली जात नाहींत. २. टपाल सह पुस्तकांची किंमत मनिऑर्डरनें पाठवावी. ३. सर्व प्रकाशनें शाळा–कॉ व ग्रंथसंग्रहालयाकरितां उपयुक्त आहेत.

*　*　*　*

**मागणी**—मो. ना. गोखले, कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था, च ११९५ सदाशिव, पुणें २, या पत्त्यावर करावी.

प्रकाशक : मो. ना. गोखले, कार्यवाह ज्योतिर्विद्या परिसंस्था, चंद्र
११९५ सदाशिव, पुणें.
मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणें

" ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् "

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें

स्थापना १९४४

ज्योतिर्विद्या परिसंस्था पुणें

JYOTIRVIDYA PARISANSTHA POONA2

सन १९६५–६६　　　*　　　वर्ष २२ वें

## वार्षिक-वृत्तान्त व समाव्यय

[ पुढील वर्षाच्या निकल्पासह ]

[ वार्षिक निकाय सभेचे निमंत्रण–मलपृष्ठ २ पाहावें ]

प्रकाशक
मो. ना. गोखले, B. Sc.
वि. वि. मोडक, G. D. C., G. C. C.
कार्यवाह

## वार्षिक निकायसभेचें निमंत्रण

चालू २३ व्या वर्षाची **निकायसभा** (General Body Meeting) **रविवार ता. ९ ऑक्टोबर** १९६६ रोजी सायंकाळीं ५ वाजतां **लो. टिळक स्मारक मंदिराचे** सभागृहांत भरेल. त्यावेळीं पुढील क्रमणिकेंत दिलेलें कामकाज होईल. तरी सर्व सद:स्थांनीं सभेस अवश्य उपस्थित रहावें ही विनंती.

### क्रमणिका

( १ ) दिवंगत सभासदांविषयीं दुखवटा
( २ ) गतवर्षाच्या ( १९६५–६६ ) निकायसभेच्या इतिवृत्तास मान्यता.
( ३ ) पूर्वप्रसिद्ध वृत्तान्ताच्या अनुरोधानें गतवर्षांतील कार्याचें निवेदन.
( ४ ) गतवर्षाच्या समाव्ययास मान्यता.
( ५ ) नवीन वर्षाकरितां ( १९६६–६७ ) पदाधिकाऱ्यांची निवड.
( ६ ) १९६६–६७ मध्ये संस्थेनें हातीं घ्यावयाची कामें
( ७ ) १९६६–६७ च्या निकल्पावर चर्चा.
( ८ ) आयत्या वेळचे विषय, ( अध्यक्षांच्या अनुमतीनें ).
( ९ ) प्राध्यक्षांचे भाषण.
( १० ) आभार.

आपले,

**मो. ना. गोखले**

पुणें, २५ सप्टेंबर १९६६ **वि. वि. मोडक**

कार्यवाह

**टीप**— सभासदांना कांहीं प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील तर त्यांनीं सभेपूर्वीं निदान ३ दिवस अगोदर कार्यवाह यांच्याकडे तसें लेखी कळवावें.

सभेस अगत्यपूर्वक उपस्थित राहावें.

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें.

ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् ।

**( स्थापना : गणेशचतुर्थी, शके १८६६, ता. २२–८–१९४४ )**

## सन १९६५–६६ चा ( २२व्या वर्षाचा ) वृत्तान्त

**प्रिय सदस्थ व संस्थेचे हितचिंतक,**

ता. ३० जून १९६६ ला संपणाऱ्या, संस्थेच्या २२ व्या वर्षाचा हा वार्षिक वृत्तान्त व समाव्यय आवश्यक त्या पत्रकांसह आपणांपुढे सादर करण्यास आम्हास आनंद होत आहे. सतत प्रगतिपथावर असणाऱ्या आपल्या संस्थेनें आतां २३ व्या वर्षांत पदार्पण केलें आहे.

### वृत्तान्तवर्षांतील पदाधिकारी

गतवर्षारंभीच्या निकायसभेने [ General body ने ] १९६५–६६ साठीं **प्रशासक–मंडळावर** व तद्विद्य मंडळावर पुढील सन्मान्य सद:स्थांची निवड केली होती.

**प्रशासक मंडळ** [ Governing Council ]

**प्राध्यक्ष :** प्रा. डी. डी. कापडिआ, एम्. ए., बी. एस्सी., आय्. ई. एस्. ( से. निवृत्त )

**अध्यक्ष :** प्रि. गो. रा. परांजपे, एम्. एस्सी., एफ्. एन्. आय्., ओ. बी. ई. ( से. निवृत्त )

**उपाध्यक्ष :** प्रा. डॉ. मो. वा. चिपळूणकर, एम्. एस्सी., डी. एस्सी., वास्तव विभाग प्रमुख, पुणें विद्यापीठ.

**नैधिक** :—प्रा० स. वि. आपटे, एम्. ए., बी. एस्सी., बी. ई. एस्. ( से. निवृत्त.)

**कार्यवाहः**—( १ ) श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी.
( २ ) श्री. वि. वि. मोडक, जी. डी. सी., जी. सी. सी.

**सदस्यः**—( १ ) प्रा. मो. ल. चंद्रात्रेय, एम्. ए., बी. ई. एस्. ( से. निवृत्त )
( २ ) श्री. द. गो. फडके, बी. ए., एल्. एल्. बी.
( ३ ) श्री. वि. धों. गोरेशास्त्री.
( ४ ) प्रा. ना. म. आठवले, एम्. ए.
( ५ ) प्रा. द. श्री. जोग, एम्. एस्सी.
( ६ ) श्री. मा. भ. पंत, बी. एस्सी., बी. टी.
( ७ ) श्री. य. रा. नेने. एम्. एस्सी. असिस्टंट मोटिऑरॉलॉजिस्ट.
( ८ ) श्री. स. ग. काजरेकर, बी. एस्सी.
( ९ ) श्री. स. चिं. मराठे, बी. ई.
(१०) श्री. श्री. शं. पतके, एम्. ए.
(११) श्री. अ. त्र्यं. ढवळे, एम्. एस्सी.

**अधिक्षकः**—( अन्तर्गत समान्वय-निरीक्षक )
श्री. श्रीपाद गोविन्द फणसळकर, बी. ए.

**तद्विद्य मंडळ** — ( Academic Council )
( १ ) प्रि. गो. रा. परांजपे,
( २ ) प्रा. डॉ. मो. वा. चिपळूणकर
( ३ ) प्रा. मो. ल. चंद्रात्रेय
( ४ ) प्रा. स. वि. आपटे
( ५ ) प्रा. ना. म. आठवले
( ६ ) प्रा. द. श्री. जोग
( ७ ) प्रा. ज. ब. कुमठेकर
( ८ ) श्री. मा. भ. पंत ( निमंत्रक ).



# वृतान्तवर्षांतील परिसंस्थेच्या कार्याचें इतिवृत्त

## ( अ ) भगोल-खगोल निदर्शनें

### ( १ ) धूमकेतूचें दर्शन

वृत्तान्तवर्षातील महत्त्वाचा ज्योतिष्यकीय आविष्कार म्हणजे **इकेया सेकी** या धूमकेतूचे दर्शन हा होय. ऑक्टोबर महिन्यामध्ये वासुकी तारासंस्थानांत एक धूमकेतू दिसूं लागल्याचे वृत्त जपानमधील वेधशाळांकडून प्रकट झाल्याबरोबर, परिसंस्थेतील कार्यकर्त्यांनी या धूमकेतूचा शोध घेण्यास सुरवात केली. त्या सुमारास हा धूमकेतू उपसूर्य येत होता परंतु स्थानिक आकाश अभ्राच्छादित असल्यामुळे त्यावेळी हा धूमकेतू पाहण्यात यश आले नाही. २० ऑक्टोबर १९६५ ला उपसूर्य बिन्दूतून जेव्हा हा धूमकेतू परतूं लागला तेव्हा मात्र परिसंस्थेकडून त्याचे वेध घेतले गेले. **इकेया सेकी** धूमकेतू दिसत असल्यासंबंधीचे प्रगटन सर्व स्थानिक वृत्तपत्रांत देऊन सतत तीन आठवडे पहाटे हा धूमकेतू नागरिकांना दाखविण्याचा व त्या संबंधी माहिती देण्याचा कार्यक्रम परिसंस्थेने केला. सुमारे ५०० नागरिकांनी या संधीचा उपयोग करून घेतला.

**इकेया सेकी** धूमकेतूचे सतत निरीक्षण केल्यानंतर त्याच्या स्वरूपासंबंधी, कक्षेसंबंधी, एक माहितीपूर्ण लेख परिसंस्थेचे कार्यवाह श्री. मो. ना. गोखले यांनी, विज्ञान विषयास वाहिलेल्या **सृष्टिज्ञान** मासिकामध्ये, व धूमकेतूची संक्षेपाने माहिती देणारा दुसरा लेख **अरविन्द** मासिकामध्ये प्रसिद्ध केला.

( २ ) **तारीख, २३ नोव्हेंबर १९६५** ला सकाळी **खंडग्रास सूर्यग्रहण** झाले त्यावेळी दूरादर्शाच्या साह्याने सूर्याचे मोठे प्रतिबिम्ब पाडून अनेक नागरिकांना ग्रहणाचे स्पर्श, मध्य, व मोक्ष हे आविष्कार, वृत्तपत्रांत पूर्वप्रसिद्धी देऊन दाखविण्यात आले. सुमारे २०० नागरिकांनी हे निदर्शन पाहिले.

( ३ ) तारीख, **४ डिसेंबर १९६५** ला रात्री ९ ते ११ पर्यंत **भगोल खगोल निदर्शनाचा** एक कार्यक्रम घडवून आणला होता. त्यावेळीं दूरादर्शाचें साह्याने द्वैती तारे, चांद्रपृष्ठ, गुरूचे उपग्रह इत्यादी दृश्ये दाखविली गेली.

**( ४ ) पुणे विद्यापीठाच्या वास्तव विभागाशी सहकार्य :—**

विद्यापीठाच्या वास्तव विभागाच्या वतीनें ता. २८, २९, व ३० मार्च १९६६ हे तीन दिवस, **' पुण्यातील व पुण्याच्या परिसरातील वास्तव शास्त्र '** या

विषयावर एक परिसंवाद घडवून आणला गेला. या परिसंवादास जोडून वास्तव शास्त्राच्या उपकरणांचे एक प्रदर्शनही भरविलेलें होते. त्या प्रदर्शनांत ज्योतिर्विद्या परिसंस्थेचे **ताराचित्रक** व खगोलीय–भगोलीय निबंधने दाखविणारा पंचमंडली गोल, दूरादर्श, इत्यादि साधने ठेविली होती. परिसंवादाच्या शेवटच्या रात्रीं **भगोल–खगोल –निदर्शनाचा** कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचे वेळीं विद्यापीठाच्या दूरादर्शाच्या जोडीस परिसंस्थेचा ३।। इंची दूरादर्शही ठेविलेला होता. श्री मो. ना. गोखले व श्री. स. ग. काजरेकर यांनी या प्रसंगीं उपस्थितांना भगोलीय निबंधनें – तारे इत्यादी संबंधीं माहिती सांगितली

**( ५ ) 'फर्स्ट स्टेट सायन्स फेअर ऑफ सेकंडरी स्कूल्स् 'ला दिलेलें सहकार्य :–**

यावर्षी महाराष्ट्रराज्यातील, सेंकंडरी स्कूल्सचा पहिला विज्ञान मेळावा, नगर येथें ता. १ व २ मे १९६६ ला भरला होता. या मेळाव्याच्या चालकांनी परिसंस्थेस खगोल–भगोल निदर्शनासाठी तज्ज्ञ निदर्शक व दूरादर्श पाठविण्या-संबंधी विनंती केली होती. या विनंतीस प्रतिसाद देऊन परिसंस्थेनें आपला पर्यावर्ती दूरादर्श व तीन तज्ज्ञ ( श्री. स. ग. काजरेकर, B. S c., श्री. मा. भ. पंत, B. S c. B. T. व श्री. स. चिं. मराठे, B. E ) विज्ञान मेळाव्यासाठी पाठविलें होते. ता, १ मेला रात्री नगर येथें आकाश थोडे अभ्राच्छादित असल्यामुळे रात्री भगोल–खगोल दर्शनाचा कार्यक्रम अंशतः सफल झाला परंतु त्यावेळी वरील तज्ज्ञांनी उपस्थितांचे गट पाडून त्यांना ज्योतिष्यकीय माहिती सांगितली. दि. २ मेला पहाटे आकाश बरचसे मोकळे होते. त्यामुळे नुकतीच झालेली **शुक्र–शनियुति** व भगोलातील कांहीं तारासंस्थाने दाखवितां आली.

विज्ञान मेळाव्याच्या समारोप प्रसंगीं मेळाव्याच्या चालकांनी परिसंस्थेने केलेल्या सहकार्याबद्दल परिसंस्थेचे आभार मानले, परिसंस्थेच्या कार्यासंबंधी, सदःस्थतेसंबंधी माहिती उपस्थितांना सांगितली.

( ६ ) तारीख २० मे १९६६ ला दुपारीं ४ ते ५ या वेळांत झालेल्या खंडग्रास सूर्यग्रहणाचे वेळी दूरादर्शाचे साह्याने मोठे बिम्ब पाडून सूर्यग्रहणाचे स्पर्श, मध्य, व मोक्ष हे आविष्कार व सूर्यावरील डाग दाखविण्यांत आले. सुमारे २०० नागरिक ह्या कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमाचे वेळीं, संस्थेने विद्यार्थ्यांचे साह्यानें तयार केलेला परावर्ती दूरादर्श नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेविला होता. तसेच परिसंस्थेचे एक सदःस्थ श्री. अ. वि. दातार यांचा ' ऑप्टिक् इंडिआ ' या कारखान्यांत तयार केलेल्या परावर्ती दूरादर्शाचेहि साह्य या कार्यक्रमास लाभले होते.

भगोल–खगोल–निदर्शनांच्या वरील सर्व कार्यक्रमास श्री. स. ग काजरेकर, श्री. स. चिं. मराठे, श्री. य. रा. नेने श्री. मा. भ. पंत, श्री. रवींद्र नेने, श्री. रवींद्र रास्ते यांचे आम्हास अमोल साह्य मिळालेले आहे.



## ( आ ) अभ्यास मंडळ

यावर्षी जवळ जवळ सातत्यानें प्रत्येक रविवारी दुपारी ३।। ते ५।। पर्यन्त किंवा क्वचित् अधिक वेळपर्यन्तहि संस्थेच्या कार्यालयात अभ्यास मंडळ भरत असे. मंडळाच्या बैठकीतून तात्कालिक महत्त्वाच्या ज्योतिष्यकीय विषयांची चर्चा होई, उदा. इकेयासेकी धूमकेतूचा भ्रमण मार्ग, कांहीं जुनें व नवे मानव निर्मित उपग्रह, अवकाशसंचाराचे सांप्रत चाललेलें प्रयोग इत्यादि. त्याचप्रमाणे इंग्रजी नियतकालिकांतील ज्योतिर्वास्तव, संवहज्योतिष्यक, विश्वोत्पत्ति, विश्वस्थिति इत्यादि विषयांवरील लेखांचे वाचन व त्यावर चर्चा होई. याशिवाय स्वतंत्रपणे कांही विषयांचा अभ्यासहि या वर्षी अभ्यास मंडळांत केला गेला. गोलीय त्रिकोणमितीचा कांही भाग प्रा. चंद्रात्रेय यानी व कांही भाग श्री. मा. भ. पंत यांनी समजावून सांगितला. त्याच प्रमाणे **सूर्यसिद्धान्त** या ग्रंथाच्या प्रथमोध्यायातील सुमारें १०० श्लोकहि अभ्यासिले–चर्चिलें गेलें.

अभ्यास मंडळाच्या बैठकांना प्रा. चंद्रात्रेय, श्री. मा. भ. पंत, श्री. य. रा. नेने, श्री. अ. व्यं. ढवळे, श्री. स. ग. काजरेकर, श्री. स. चिं. मराठे, श्री. रवींद्र नेने श्री. नावलेकर, श्री. रास्ते, श्री. मोडक, श्री. गोखले, इ. मंडळी उपस्थित असत.

## ( इ ) लेखन संपादन

( १ ) परिसंस्थेचे अध्यक्ष प्रि. गो. रा. परांजपे यांनी लिहिलेले पुढील दोन ग्रंथ :– ( १ ) **पारिभाषिक संज्ञांचा व्याख्याकोश.**
( २ ) **आकाशदर्शन.**

**महाराष्ट्रराज्य साहित्य व संस्कृति मंडळाने** मंडळाची प्रकाशने म्हणून प्रकाशनासाठी स्वीकारले आहेत. **पारिभाषिक संज्ञांच्या व्याख्यानकोशांत,** गणित, वास्तव रसायन हे विषय आले आहेत. **आकाशदर्शन** या ग्रंथात प्रत्येक महिन्यांत दिसणाऱ्या तारांगणाचें नकाशे व आकाशात दिसणाऱ्या सर्व तारासंस्थानांची उद्बोधक शास्त्रीय माहिती व त्यांच्यासंबंधीच्या पौराणिक आख्यायिका आलेल्या आहेत. विज्ञान विषयाच्या शिक्षणासाठी हे दोन्ही ग्रंथ अत्यन्त उपयुक्त ठरतील.

( २ ) परिसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांपैकीं कांहीनी अंगिकारलेले ' विश्वकोशातील ज्योतिः शास्त्रविषयक लेखन यावर्षी बरेचसे पूर्ण केले.

( ३ ) परिसंस्थेचे उपाध्यक्ष. डॉ. मो. वा. चिपळूणकर यांनी ता. २७-३-६६ च्या केसरीत, शनीच्या वलयांच्या अदृश्य होण्याच्या चमत्कारासंबंधी उद्बोधक लेख लिहिला.

( ४ ) श्री. रवींद्र नेने यांनी, रशियाने फेब्रुवारी महिन्यांत चंद्रावर अलगद उतर-विलेल्या ल्यूना–९ संबंधी एक उद्बोधक लेख केसरीमध्ये लिहिला.

( ५ ) श्री. मा. भ. पंत यांनी विविध ज्योतिष्यकीय विषयांवर सृष्टिज्ञान मध्ये लेख लिहिले.

## ( ई ) उपकरण निर्मिति

**परावर्ति दूरादर्शाची जुळणी** :— विद्यार्थ्यांच्या साह्यानें परावर्ति दूरादर्श तयार करण्याचे मागील वर्षी सुरुं केलेलें काम या वर्षी जवळ जवळ पूर्ण होत आले आहे. आतां अल्पशा प्रयत्नांनंतर हा दूरादर्श उपयोगांत आणता येईल. दूरादर्शाच्या रचनेच्या कार्यांत श्री. रवींद्र रास्ते, श्री. रवींद्र नेने श्री. चंद्रमोहन नावलेकर श्री. मा. भ. पंत, श्री. य. रा. नेने यांनीं अविश्रान्त परिश्रम घेतले त्यामुळे ता. २० मे १९६६ च्या सूर्यग्रहणाचे वेळी हा दूरादर्श लोकांना अवलोकनार्थ ठेवता आला.

## ( उ ) व्याख्यानें :—

( अ ) परिसंस्थेच्या वतीने या वर्षी पुढील दोन स्फुट व्याख्यानें झाली.

| दिनांक | विषय | व्याख्याने | स्थळ |
|---|---|---|---|
| २१–११–६५ | आगामी सूर्यग्रहण | श्री. अ. त्र्यं. ढवळे. | पूना इंग्लिश स्कूल. |
| ८–४–६६ | ताऱ्यांचे दोन प्रकार | श्री. मा. भ. पंत. | राणी लक्ष्मी मंडळ. |

( आ ) परिसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीं अन्य संस्थांच्या निमंत्रणावरून, वैज्ञानिक विषयांवर पुढील व्याख्याने दिली.

| दिनांक | विषय | व्याख्याने | निमंत्रक संस्था |
|---|---|---|---|
| ४–७–६५ | न्यूटनचे नियम व अवकाशसंचार | श्री. मो. ना. गोखले | महा. औद्यो. संग्रहालय |
| २–१२–६५ | धूमकेतु— | ” | ” |
| ३०–१–६६ | सौर शक्ति | ” | ” |
| २७–५–६६ | विश्वोत्पत्तीच्या तीन कल्पना | ” | ” |
| २१–५–६६ | अग्निबाण | श्री. स. ग. काजरेकर | ” |
| २५–५–६६ | आकाशगंगा आणि ताऱ्यांची उत्पत्ती | श्री. मा. भ. पंत. | ” |

## ( ऊ ) शैक्षणिक चित्रपट :

युनाइटेड स्टेट्स् इन्फर्मेशन सर्विसच्या सहकारानें, शनिवार तारिख १४–५–६६ ला सायंकाळीं ७ ते ८॥ या वेळेंत **पेरूगेट भावेस्कूलच्या सभागृहात** संस्थेच्या सदस्यांसाठी खालील तीन उद्बोधक वैज्ञानिक चित्रपट दाखविण्यात आले.

( 1 ) Gemini VI & VII-Rendezvous
( 2 ) Savanah
( 3 ) Destination Man



G. D. APTE & Co.
Chartered Accountants

Schedule VIII
vide Rule 17 (1) Date: 25th July, 1966

Name of the Public Trust: JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA

Balance Sheet as at 30th June, 1966.

| FUNDS & LIABILITIES | | Rs. Ps. |
|---|---|---|
| Trust Fund or Corpus | | 1,983–25 |
| Research Reserve Fund as per last B/S | 1,000 | |
| Additions during the year | 500 | 1,500–00 |
| Life Members Subscription (Permanent Fund) | | 100–00 |
| Rent | | 25–00 |
| Income & Expenditure A/c | | |
| As per last B/S | 6,015–33 | |
| Less Deficit | 601–77 | 5,413–56 |
| Total Rs. | | 9,021–81 |

| ASSETS | | Rs. Ps |
|---|---|---|
| Library Books | | |
| As per last B/s | 244–32 | |
| Additions during the year | 4–10 | |
| | 248–42 | |
| Less Depreciation @ 10% | 24–84 | 223–58 |
| Furniture & Fixtures | | |
| As per last B/S | 387–76 | |
| Additions during the year | 303–00 | |
| | 690–76 | |
| Less Depreciation @ 10% | 69–08 | 621–68 |
| Equipment | | |
| As per last B/S | 78–05 | |
| Additions during the year | 10–34 | |
| | 88–39 | |
| Less Depreciation | 8–84 | 79–55 |
| Stock of Publications (Books) | | 2,588–89 |
| Cash & Bank Balance | | |
| a) Bank A/c: Cosmos Co-op. Urban Bank | | 5,348–17 |
| b) Cash with Trustees | | 159–94 |
| Total Rs. | | 9,021–81 |

The above Balance Sheet to the best of my / our belief contains a true account of the Funds Liabilities and of the Property and Assets of the Trust.

Dated at Poona 25th July, 1966
Trustees: Sd/– M. N. Gokhale (Secy.)
Sd/– S. V. Apte ( Treasurer )

As per our report of even date.
Sd/– G. D. Apte & Co.,
Chartered Acctts., Auditors.

## ज्योतिर्विद्या परिसंस्था

### १९६६–६७ चा निकल्प

| १९६५–६६ | आय अपेक्षित | | १९६५–६६ | व्यय अपेक्षित | |
|---|---|---|---|---|---|
| ३३६ – ०० | वर्गणी | ५०० – ०० | २३० – ६३ | पगार | २४० – ०० |
| २४५ – ७० | देणग्या व अनुदान | १००० – ०० | ४ – १० | ग्रंथसंग्रह | ३०० – ०० |
| २२४ – ०७ | व्याज | २०० – ०० | १० – ३४ | साधन संभार | १,००० – ०० |
| ७४ – १२ | पुस्तक विक्री | १०० – ०० | १६२ – ६९ | व्याख्यानें, अभ्यास मंडळ, आकाश निदर्शनें | २०० – ०० |
| | | १८०० – ०० | १८८ – ३५ | कचेरी खर्च | ३०० – ०० |
| | अंदाजी तूट… | | ३१५ – ०० | जागा भाडे | ३०० – ०० |
| | ( संस्थेच्या कायम निधीमधून ) | ९४० – ०० | ३०३ – ०० | फर्निचर | ४०० – ०० |
| | | २,७४० – ०० | | | २,७४० – ०० |



G. D. Apte & Co.
Chartered Accountants

with the Assistant Charity Commissioner, Poona
In the matter of Act XXIX of 1950
and
In the matter of

## JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA

Public Trust
Public Trust No. F–44

Audit for the year ending 30th June 1966

We, the undersigned Auditors, hereby report that:

(a) The accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the rules;
(b) The receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts;
(c) The cash balance and vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts;
(d) The books, deeds, accounts, vouchers or other documents or record required by us were produced before us;
(e) Inventory certified by the trustee of the moveables of the public trust has not / has been maintained;
(f) The manager or trustee appeared before us and furnished the necessary information required by us;
(g) The property or funds of the trust were not applied for any object or purpose other than the object or purpose of the trust;
(h) The amounts of outstandings for more than one year are Rs. NIL and the amounts written off are Rs. NIL.
(i) Tenders were/were not invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5000=00. Not applicable;
(j) Any money of the public trust has not been invested contrary to the provisions of Sec. 35;
(k) Alinations of the immovable property contrary to the provisions of Sec. 36 have not come to our notice.

United Western Bank Building
Laxmi Road, Poona 2
25th July 1966.

Sd/- **G. D. APTE & CO.**
Chartered Accountants

G. D. Apte & Co.
Chartered Accountants

**Schedule IX C** ( vide rule 32 )
Poona 2. 25th July 1966

**Statement of income liable to contribution for the year ending 30th June 1966**

Name and registered No. of Public Trust

**Jyotirvidya Parisanstha, Poona F–44**

| | Rs. Ps. |
|---|---|
| Gross annual income | 879–89 |
| Details of income not chargeable to contribution under Section 58 and Rule 32 : | The institution is a Public Trust exclusively for advancement and Propagation of secular education and hence its income is not liable to contribution as per Rule 31 (1)(a) of the Bombay Public Trusts Rules. |
| Deduction on account of repairs in respect of buildings not rented and yielding no income at 8⅓ per cent. of the estimated gross annual rent. | |
| Income liable to contribution Rs. | NIL |

Dated at Poona 25th July 1966

Trustees—

Sd. M. N. Gokhale,
(Secretary)
Sd. S. V. Apte,
(Treasurer)

Sd. G. D. Apte & Co.
Chartered Accountants

# ज्योतिर्विद्या परिसंस्थेची प्रकाशने

## उपयुक्त व संग्राह्य

( १ ) **सूर्यकुल** – ( संग्राहक : प्रा. मो. ल. चंद्रात्रेय व कै. त्र्यं. गो ढवळे ) सूर्यकुलामधील निरनिराळे ग्रह व उपग्रह, उल्का, लघुग्रह, धूमकेतु इ. संबंधानें ज्ञानसंवर्धक, अद्ययावत् व उपयुक्त माहिती. सुबोध भाषा. विद्वानांनी एकमुखानें वाखाणलेले व महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेनें ( डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें ) पारितोषिक देऊन गौरविलेलें. पृष्ठसंख्या २८०, किंमत रु. ५

*     *     *     *

( २ ) **तारकानगरी**–तारकांनीं व्यापिलेल्या एकंदर विश्वाविषयीं उद्‌बोधक माहिती. तारकादिकांची ओळख, आकाशगंगेचें स्वरूप, दूर अंतरावरच्या ताऱ्यांची माहिती कशी मिळविली जाते, ताऱ्यांच्या गति कशा काढतात, अंतराळांतल्या अनेक विश्वांचें स्वरूप इ. उपयुक्त व मनोरंजक माहिती. याहि प्रकाशनाला डे. व्ह. ट्रान्सलेशन सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलें आहे व विद्वानांनीं प्रशंसिलें आहे. पृष्ठसंख्या १६५, किंमत ३ रु.

*     *     *     *

( ३ ) **ताराचित्रक संच** – ( आवृत्ति दुसरी, दोन रंगांत छपाई ) ठळक ठळक ताऱ्यांची ओळख करून देणारे, आकाशाच्या देखाव्यावरून तारीख व वेळ सांगणारे तसेच तारीखवेळेवरून आकाशाचें कोणतें दृश्य दिसूं शकेल त्यांचा बोध करणारे दोन मोठे नकाशे. आकार : अनुक्रमें ४०×३० व २७×२२॥ इंच. सोबत खुलासा देणारी विवरण पुस्तिकाहि मिळते. सर्व संचाची किंमत रु. १·५०.

*     *     *     *

( ४ ) **वेधसाधनें व वेधशाळा**– प्राचीन काळापासून वेध घेण्याची साधनें कोणतीं होतीं. त्यांची वाढ व परिणति पुढे कशी झाली, त्यांची रचना, वेधशाळांचें सामान्य स्वरूप व तेथील कार्य व संवहज्योतिष्यक ( Radio Astronmy ) या विषयींची माहिती या ग्रंथांत सुबोध रीतीनें दिली आहे. किंमत रु. २·७५.

*     *     *     *